# नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र या संस्थेची नियमावली

## बृहन्मुंबई महानगरपालिका

एप्रिल 2021

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावना | पृष्ठ क्र. 3 |
| 2 | नियमावली क्रमांक : 1 | पृष्ठ क्र. 4 ते 10 |
| 3 | नियमावली क्रमांक : 2 | पृष्ठ क्र. 11 ते 24 |
| 4 | नियमावली क्रमांक : 3 | पृष्ठ क्र. 25 |
| 5 | नियमावली क्रमांक : 4 | पृष्ठ क्र. 26 |
| 6 | नियमावली क्रमांक : 5 | पृष्ठ क्र. 27 ते 28 |
| 7 | नियमावली क्रमांक : 6 | पृष्ठ क्र. 29 |
| 8 | नियमावली क्रमांक : 7 | पृष्ठ क्र. 30 |
| 9 | नियमावली क्रमांक : 8 | पृष्ठ क्र. 31 |
| 10 | नियमावली क्रमांक : 9 | पृष्ठ क्र. 32, 33 |
| 11 | नियमावली क्रमांक : 10 | पृष्ठ क्र. 34 ते 35 |
| 12 | नियमावली क्रमांक : 11 | पृष्ठ क्र. 36 ते 38 |
| 13 | नियमावली क्रमांक : 12 | पृष्ठ क्र. 39 |
| 14 | नियमावली क्रमांक : 13 | पृष्ठ क्र. 40 |
| 15 | नियमावली क्रमांक : 14 | पृष्ठ क्र. 41 |
| 16 | नियमावली क्रमांक : 15 | पृष्ठ क्र. 42 |
| 17 | नियमावली क्रमांक : 16 | पृष्ठ क्र. 43 |
| 18 | नियमावली क्रमांक : 17 | पृष्ठ क्र. 44 |

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र

**प्रस्तावना**

कायदा व न्याय मंत्रालय
(वैधानिक विभाग)
नवी दिल्ली, 21 जून 2005 / जेष्ठ 31 शके 1927 रोजी

खाली नमूद केलेला अधिनियम दि.15 जून 2005 रोजी राष्ट्रपतींच्या अनुमतीने संसदेत प्राप्त झाला आणि सामान्य माहितीसाठी तो येथे प्रसिध्द होत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, 2005
(2005 चा क्र.22) (15 जून 2005)

सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली असलेली माहिती नागरिकांना सुरक्षितपणे मिळण्यासाठी, सदर अधिनियमांची मांडणी करुन माहितीच्या अधिकाराच्या प्रत्यक्ष राजवटीची तरतूद करण्यात आली आहे, की जेणेकरुन संविधानातील केंद्रीय माहिती आयोग, राज्यमाहिती आयोग आणि संबंधीत किंवा अनुषंगिक बाबी यासंबंधातील प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामातील पारदर्शकता व जबाबदारी यांची वाढ करता येईल.

ज्याअर्थी भारतीय संविधानाने लोकशाही प्रजासत्ताकाची स्थापना केली आहे;

आणि ज्याअर्थी नागरिकांना माहिती असणारी आणि माहितीची पारदर्शकता असायला हवी अशी लोकशाही, ज्याचे कार्य मोठया प्रमाणात आहे आणि ज्यात भ्रष्टाचाराचा अंतर्भाव आहे आणि जे शासन व त्यांचे निमीतत्व जबाबदार शासित धरले जातील;

आणि ज्याअर्थी प्रत्यक्ष प्रचलित पध्दतीनुसार माहिती उघड करणे हे सार्वजनिक हितसंबंधात शासनाची प्रभावी कारवाई, अनुकुलतम मर्यादीत आर्थिक साधनसामुग्रीचा वापर आणि संवेदनाक्षम माहिती, गोपनियता राखणे यासंबंधीची माहिती असलेली इतर माहिती सार्वजनिक हितसंबंधात संघर्षमय ठरेल; आणि ज्याअर्थी लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्च सार्वभौमत्व टिकविण्यासाठी अशा संघर्षमय हितसंबंधात सुसंवाद साधणे आवश्यक आहे.

आता, त्यामुळे जे नागरिक ठराविक माहिती मिळवू इच्छितात त्यांना ती उपलब्ध करुन देणे इष्ट आहे.

15 जून 2005 च्या भारत सरकारच्या या माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमानुसार, नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र या विभागातर्फे मॅन्युअल तयार करुन सविनय सादर करीत आहोत.